**नवी मुंबई महानगरपालिका**
**प्रशासन विभाग, दिनांक 21/04/2020**

या कार्यालयाचे आदेश दिनांक 13/03/2020 अन्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आपली वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय तज्ञ या संवर्गातील पदांसाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्तीबाबतचे आदेश स्वीकारणेकरीता नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.nmmc.gov.in) दि. 13/03/2020 रोजी सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानूसार दिनांक 13/03/2020 ते दि. 20/03/2020 रोजीपर्यत नियुक्ती आदेश स्वीकारुन कामावर रुजू होणेबाबत कळविण्यात आले होते.

तथापि आपण आपले नियुक्ती आदेश दिनांक 20/03/2020 रोजीपर्यत स्वीकारलेले नाहीत अथवा नियुक्ती आदेशानूसार कामावर रुजू झालेला नाहीत तसेच त्याबाबत आपण नवी मुंबई महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारे कळविलेले नाही. सबब, सदर नियुक्ती आदेश स्वीकारुन आपण महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रुजू होणार आहात अथवा कसे याबाबत आपला लेखी खुलासा दि. 03/05/2020 पर्यत या कार्यालयास सादर करावा. सदर मूदतीत आपला कोणताही खुलासा या कार्यालयास प्राप्त न झाल्यास आपणांस नवी मुंबई महानगरपालिकेच्या नोकरीत स्वारस्य नसल्याचे गृहीत धरुन आपले नियुक्ती आदेश रद्द करण्यात येईल व प्रतिक्षायादीतील उमेदवाराची सदर पदावर नियुक्ती करण्यात येईल. तसेच आपला सदर नियुक्तीवरील हक्क संपुष्टात आणण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**उपायुक्त (प्रशासन)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

Scanned with CamScanner